# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०८/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा चापेगडी येथे दिनांक दि. ०७/०४/२०२२ चे ०१.३० वा. सुमारास अहिल्याबाई आत्माराम मांढरे हिच्या घरी दोघे संशयीत व्यक्ती हे घरफोडी करण्याच्या उद्देशाने त्यांचे घराचा दरवाजा उघडत असतांना त्यांना आवाज आल्याने जाग आला असता त्यांनी आरडा–ओरड केली असता शेजारील व गावातील काही लोकांनी आरोपी क्र. १. मितराम मोहनलाल यादव वय ४२ वर्ष रा. इंदीरा नगर, अजनी रेल्वे स्टेशनचा मागे नागपुर यास पकडले व त्याचे सोबत बसलेला २. सुमेश विद्याधर उइके वय २१ वर्ष, रा. पंचशील नगर हिंगणा नागपूर हा पळुन गेला. तपासा दरम्यान दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अशोक लक्ष्मण तळेकर वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ चापेगडी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११, ३४ भादंवि. सहकलम ४, २५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री देवीदास ठमके मो.नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. खापरखेडा** :– दिनांक ०६/०२/२०२२ चे २२:०० वा. ते २३.०० वा. चे सुमारास पीडित अल्पवयीन वय ५ वर्ष हि तिचे वडीलांसह आरोपी नामे– सुंनिल उर्फ मोटू ध्यानलाल धुर्वे, वय २६ वर्ष, रा. वलनी वार्ड नं. ३ तट्टा लाईन याचे घरी टी.व्हि. पाहण्याकरीता गेली होती. ति टी.व्हि. पाहतांना सोफ्यावर झोपली असता आरोपीने पीडित मुलीला तिचे घरी झोपविण्यासाठी नेवून ठेवतो म्हणून घरामागील शेतात घेवून गेला व तिच्या सोबत बळजबरीने लैंगिक अत्याचार करून जबरी संभोग केला. याबाबत कोणालाही काही सांगितले तर आई,वडील,नाना,नानी,भाउ यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (एबी),२(जे)(के), ३६३, ५०६ भादंवि. सहकलम ४, ८ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हदयनारायण यादव मो.नं. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक ०६/०४/२०२१ चे १३.०५ वा. ते ०७/०४/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष हीच्या अल्पवयीन असल्याच्या व अजाणतेपणाचा फायदा घेवून माहे एप्रील २०२१ पासुन आरोपी नामे— सुरज लक्ष्मण घोडसे, वय २० वर्ष, रा. सणसवाडी जि. पुणे याने इन्टाग्रामवर तिचेशी मैत्री करुन प्रेम संबध ठेवले व नंतर त्याचेशी बोलणे बंद केले. त्याने इन्टाग्रामवर फिर्यादीला सुसाईड करीन अशी धमकी दिली. तसेच दोघांचे सोबतचे फोटो व बदनामी कारक मॅसेज इन्टाग्रामवर टाकुन फिर्यादीची बदनामी केली. त्यावर दि. ०७/०४/२०२२ रोजी वेळ १६.०० वा. सुरुवातीला फिर्यादीला बोलतांना दिसत असलेला व नंतर अश्लील विडीयो क्लीप असलेला विडीयो असा एडीट करुन विडीयो इन्टाग्राम वर टाकला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ अ, ३५४ सी, ३५४ डी, ५००, ५०६ भादंवी. सहकलम १२, १३, १४ बालकाचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधि. २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी रासकर मो.न ९०८२१९६०८० या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

१) **पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत शिवाजी चौक सावनेर येथे दिनांक ०७/०४/२०२२ चे १९.३० वा. ते १९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— मधुपूरी देवपूरी गोस्वामी ४६ वर्ष रा. पाटणसावंगी, ता. सावनेर यांचा गावातील मानलेला भाचा नामे— प्रकाश मारोती लामसे, वय ४८ वर्ष, रा. पाटणसावंगी हे पाटणसावंगी बाजारातून पायदळ घराकडे जात असतांना एम.एच— ३१/सीव्ही— ५४८० क्रमांकाच्या ऑटो चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्यास धडक दिली. या अपघातात प्रकाश लामसे हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री फुलेकर मो.क्र. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

२) **पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा ईसापुर येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे ११.०० वा. ते दिनांक ०६/०४/२०२२ चे ११.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— निहाल उर्फ विरेन्द्र बस्तीराम सीरसाम, वय २७ वर्ष, रा. विवरा ता. नरखेड यांच्या सोबत असणारे तीन लोक मोहपा येथील बैल बाजारातुन घेतलेले बैल विकत घेवुन रस्ताने घुबडमेट ते लोहगड मार्ग जात होते. त्यादरम्यान मागुन येणारी एमएच— ४०/बिएल— ८९४० क्रमांकाच्या पीकअप गाडीचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आणुन फिर्यादी सोबत असणारा एमएच— ४०/यु— ३७०२ क्रमांकाच्या मोटरसायकल चालक नामे— सागर संतोषराव धुर्वे, वय ३० वर्ष, रा. भारसिंगी याला धडक दिली. या अपघातात सागर धुर्वे हा गंभीर जखमी झाला व मागे बसलेला अतुल उत्तमराव चौधरी वय २२ वर्ष, हिवरा याचा उजवा पाय फक्चर झाला. तसेच **श्याम मारोती खडसे, वय ३४ वर्ष, रा. कलंभा** हा जागीचा मरण पावला व ३ बैल जागीच मरण पावले तसेच ३ बैल गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३६, ३३७, ३३८, ३०४ (अ), ४२७, ४२९ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेन्डे मो.नं. ९९२३१९३६४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**